बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस क्र. २८१ | नोटीस | दि. ०१/०८/२०२५

# नोटीस

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता महाडीबीटी पोर्टलवरून अद्याप ऑनलाईन अर्ज न भरलेल्या तसेच शै.वर्ष २०२३-२४ किंवा २०२४-२५ करिता अर्ज रि-अप्लाय करणे शासनाने दिलेल्या दि. ३१ ऑगस्ट २०२५ या तारखेच्या अंतिम मुदतवाढीबाबत.**

महाविद्यालयातील खालील अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शासनाच्या नियमानुसार राखीव (SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT) /खुल्या (Open-EBC/ EWS/ SEBC/ORPHAN) प्रवर्गातील ज्या ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क अथवा विकास निधी इत्यादी शुल्क माफ करून प्रवेश देण्यात आलेला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क अथवा विकास निधीची प्रतिपूर्ती शासनाकडून महाविद्यालयाला होत असते त्यासाठी सवलतधारक विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक व बंधनकारक आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या करिता महाडीबीटी पोर्टलवरील योजनेस पात्र असणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही तांत्रिक कारणास्तव अथवा कागदपत्रांअभावी अथवा इतर कोणत्याही कारणाने महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज भरले नसतील अशा सर्व विद्यार्थ्यांनी शासनाच्या https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन अर्ज भरणेकरिता शासनाने **दि.३१/८/२०२५** ही अंतिम तारीख दिलेली आहे त्या तारखेपर्यंत विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक व जरूरीचे आहे. त्यासाठी विद्यार्थींनी सर्व (मूळ) ओरीजनल कागदपत्रे अपलोड करून ऑनलाईन अर्ज **दि. ३१/८/२०२५** या अंतिम तारखेपूर्वी भरून घ्यावा व महाविद्यालयाच्या विद्यार्थी विभागात अर्ज व कागदपत्रे तपासणीसाठी उपस्थित राहावे.

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी शै.वर्ष २०२३-२४ किंवा २०२४-२५ करिता ऑन लाईन अर्ज भरलेला आहे परंतू सदर अर्ज विद्यार्थ्याच्या लॉगीनला काही दुरूस्ती/चुकीची कागदपत्रे अपलोड केल्याने (Send Back to Applicant) अथवा अचूक भरणेकरिता पाठविलेला आहे तो अर्ज त्या विद्यार्थ्यांनी त्याचे लॉगीनव्दारे त्वरीत दुरूस्ती करून Re-apply करून submit करणे अत्यंत आवश्यक व जरूरीचे आहे अन्यथा अशा विद्यार्थ्यांची प्रतिपूर्ती शासनाकडून होणार नाही. परिणामी अशा विद्यार्थ्यांकडून संबंधित वर्षाचे शुल्क वसूली केली जावू शकते याची नोंद घ्यावी.

ज्या विद्यार्थ्यांनी शै.वर्ष २४-२५ करिता अद्यापही अर्ज भरलेले नसतील तर वरील मुदतीत अर्ज भरणेकरिता विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारे दिरंगाई व टाळाटाळ करू नये. अन्यथा विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क अथवा विकास निधीची प्रतिपूर्ती शासनाकडून महाविद्यालयास न झाल्यास अशा प्रसंगी सदर शुल्काची वसूली विद्यार्थी व त्याचे पालकाकडून करण्यात येईल याची नोद संबंधित सवलतधारक विद्यार्थ्यांनी घ्यावी. विद्यार्थी/विद्यार्थीनी यांचेकडून महाडीबीटी पोर्टलवरून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता ऑनलाईन अर्ज भरला गेला नाही तर त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

## -: महत्त्वाची सूचना :-

१) इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे शासन परिपत्रक क्र.: शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण, दि.१५ ऑक्टोंबर, २०२४ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून OBC/SBC/VJ/DT/NT/SEBC या प्रवर्गासाठी शासनाने उत्पन्न मर्यादेची अट काढून टाकलेली असून त्याऐवजी विद्यार्थ्यांना नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या आधारे व इतर अटी शर्तीच्या आधारे शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवरील योजनांव्दारे लाभ देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे वरील प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचे पालकांचे वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा जास्त आहे परंतू त्यांचेकडे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र आहे (वैधता ३१.३.२०२५ पर्यंतची आहे) तसेच शासनाच्या केंद्रिय प्रवेश प्रक्रियेव्दारे (कॅप) ज्या प्रवेश निश्चित झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून वरील दिल्या गेलेल्या मुदतीपूर्वी ऑनलाईन अर्ज सादर करावेत म्हणेजच शासनाकडून त्यांचे शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती केली जाणार आहे याची नोंद घ्यावी.

२) ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश Against CAP स्तरावर झालेले आहेत व शासनाच्या नियमानुसार Post Matrics Scholarship (शिष्यवृत्ती) योजनेसाठी पात्र आहेत किंवा होत आहेत (ओपन व एसईबीसी विद्यार्थी वगळून) त्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी. SC/ST प्रवर्गासाठी - Rs.2.5 Lakhs Below, (रूपये दोन लाख पन्नास हजार पर्यंत) वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट आहे तर OBC/SBC/VJ/DT/NT साठी Rs.1.5 Lakhs Below (रू एक लाख पन्नास हजार फक्त) वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट आहे. असे उत्पन्न असलेल्याच विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत अन्यथा अर्ज करू नयेत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

विश्वकर्मा इन्स्टिट्युट पुणे-३७. Vishwakarma Institute of Technology

संचालक
विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे-३७

प्रत: १) सर्व विभाग प्रमुखांना माहितीसाठी, २) सर्व नोटीसबोर्डकरिता, ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना माहितीकरिता व विभागाचे नोटीस बोर्डकरिता प्रकाशित करणेकामी.